# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहराची वाढती लोकसंख्या, शहर वायु प्रदुषण यातुन मुक्तता
**{परिवहन विभाग}** आणि प्रवाश्यांना आरामदायक प्रवास उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मा.ना. देवेन्द्र फडणविस, उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार २५० वातानुकुलीत ई-बसेसकरीता राज्य शासनाकडे १३७ कोटीचा प्रस्ताव परिवहन विभागातर्फे मा. प्रशासक/आयुक्त, मनपा यांनी दि. ३१/०३/२०२३ रोजी सादर केला होता. उक्त प्रस्ताव शासनाने मंजुर केला असून या ई-बसेसच्या खरेदीकरीता संबधीत क्षेत्रातील तांत्रिक तज्ञ/सक्षम एजेन्सी कडून RFP बनविण्याचे प्रस्तावित आहे. सक्षम, अनुभवी एजन्सीची नियुक्ती RFP बनविण्याकरीता व्हावी व ही पुर्ण प्रक्रिया पारदर्शी व निरआक्षेपपुर्ण व्हावी म्हणुन ही निविदा प्रक्रिया QCBS आधारीत असणे गरजेचे आहे.

सबब २५० बसेस खरेदी करण्यास तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता QCBS या निकषावर निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 354/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 26/ 04/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराची वाढती लोकसंख्या, शहर वायु प्रदुषण यातुन मुक्तता आणि प्रवाश्यांना आरामदायक प्रवास उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मा.ना. देवेन्द्र फडणविस, उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार २५० वातानुकुलीत ई-बसेसकरीता राज्य शासनाकडे १३७ कोटीचा प्रस्ताव परिवहन विभागातर्फे मा. प्रशासक/आयुक्त, मनपा यांनी दि. ३१/०३/२०२३ रोजी सादर केला होता. उक्त प्रस्ताव शासनाने मंजुर केला असून या ई-बसेसच्या खरेदीकरीता संबधीत क्षेत्रातील तांत्रिक तज्ञ/सक्षम एजेन्सी कडून RFP बनविण्याचे प्रस्तावित आहे. सक्षम, अनुभवी एजन्सीची नियुक्ती RFP बनविण्याकरीता व्हावी व ही पुर्ण प्रक्रिया पारदर्शी व निरआक्षेपपुर्ण व्हावी म्हणुन ही निविदा प्रक्रिया QCBS आधारीत असणे गरजेचे आहे.

सबब २५० बसेस खरेदी करण्यास तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता QCBS या निकषावर निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**